

फुटबॉलच्या आकाशातील तेजस्वी तारा;

लिओनेल मेस्सी... पान 2

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**॥ आजचा सुविचार ॥**

एखादा देश आणि त्याची नैतिक मुल्ये
किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना
कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.

– महात्मा गांधी

वर्ष : ०६ | अंक : २०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०३ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आम्हीच खरी शिवसेना आहोत, सुनावणीनंतर एकनाथ शिंदे यांचं वक्तव्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा युक्तिवाद पूर्ण झाला आहे. यानंतर बुधवारी (२ सप्टेंबर) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वकिलांकडून युक्तिवाद करण्यात आला. ज्येष्ठ वकील नीरश किशन कौल यांनी युक्तिवादाला सुरुवात केली.

त्यांनी शिवसेना पक्षात नेमकं बंड का झालं? याबद्दल सविस्तर घटनाक्रम सांगितला. तसेच २०१८ च्या पक्षाच्या घटनेबाबतही वकील नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. २०१८ ची घटना ही लोकशाहीवादी नव्हती, असा युक्तिवाद त्यांनी केला. पक्षात एकाधिकारशाही होती, असा आरोप शिंदेंच्या वकिलांनी केला.

सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीनंतर एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. एकनाथ शिंदे हे देखील आज दिल्लीला आहेत. एकनाथ शिंदे यांच्या काही महत्त्वाच्या बैठका दिल्लीत होत्या. तसेच सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर वकिलांसोबत चर्चा करण्यासाठीदेखील आपण दिल्लीत आल्याचं शिंदेंनी स्पष्ट केलं होतं. त्यानंतर सुनावणी पार पडल्यावर पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर एकनाथ शिंदे यांनी भूमिका मांडली.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

चर्चा सुरु झालेली आहे. शिवसेनेची बाजू मांडण्याचं काम सुरु झालं आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची घटना आणि विचार नंतर कसे पायदळी तुडवले हे महाराष्ट्राने आणि देशाने पाहिलेले आहे. त्यामुळे त्यांची घटना आणि विचार सगळंच बदललं. त्यामुळेच महाराष्ट्रामध्ये त्यांनी बहुमत गमावलं. बाळासाहेबांचे विचार गोठवलं, जनतेचं बहुमत गोठवलं, हिंदुत्व गोठवलं, आता धनुष्यबाणही गोठवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेने जो निर्णय घेतला तो सर्वांना माहिती आहे. महाराष्ट्राची जनता आमच्या सर्वांच्या पाठिशी आहे. जनतेने आम्हाला स्वीकारलं आहे, आशीर्वाद दिला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

**आम्हीच खरी शिवसेना, शिंदेंचा दावा**

खरी शिवसेना आम्हीच आहोत. आम्ही दुसऱ्या पक्षात गेलोय का? शिवसेनेचाच मुख्यमंत्री झाला आहे. आम्ही दुसऱ्या पक्षात गेलो नाही. आम्ही बहुमताने शिवसेना पक्षात राहिलो. ज्यांनी बाळासाहेबांचे विचार बदलले त्यांनी दुसरा निर्णय घेतला. हा सर्व न्यायप्रविष्ट भाग असल्यामुळे या विषयावर स्पष्टीकरण आणि विस्तीर्णपणे बोलू शकत नाही, अशी भूमिका शिंदे यांनी मांडली.



**'लोकशाहीत बहुमत हेच महत्त्वाचं', शिंदेंची प्रतिक्रिया...**

बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर ही परिस्थिती निर्माण झाली. पक्ष संघटनेच्या पदांसाठी निवडणुका वगैरे काही नाही तर नियुक्त्या होऊ लागल्या. मनमानी होऊ लागली. त्यामुळेच बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, माझी शिवसेना विचारधारेपासून दूर होऊ शकत नाही. माझी काँग्रेस होऊ शकत नाही. अन्यथा मी दुकान बंद करेन. पण त्याउलट विपरित जे काही घडलं ते महाराष्ट्राने पाहिलं आहे. त्यामुळे लोकशाही मानणारे, बाळासाहेबांचे विचार मानणारे आम्ही आहोत. त्यामुळे लोकशाहीत बहुमत हेच महत्त्वाचं असतं, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

**शिंदेंच्या वकिलांनी काय युक्तिवाद केला?**

शिंदेंच्या वकिलांना २०१८ ची पक्षाची घटना ही लोकशाहीवादी नव्हती, असं म्हटलं. तसेच २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपसोबत निवडणूक लढवली. पण निकालांनंतर ज्यांच्याविरोधात निवडणूक लढली त्यांच्यासोबत सरकार स्थापन केलं. यामुळे पक्षात मतभेद झाले. यातून पक्षात उठाव झाला, असा युक्तिवाद शिंदेंचे वकील कौल यांनी केला. यावेळी कौल यांनी पक्षात एकाधिकारशाही असल्याचा आरोप केला.

बाळासाहेब ठाकरे यांनी तयार केलेली १९९९ ची घटना का बदलली गेली? बाळासाहेबांच्या काळात निवडणूक आयोगाने सांगितलेल्या सूचनांचे पालन करण्यात आले. पण नंतर पक्षात संघटनात्मक पदांसाठी निवडणुका झाल्या नाहीत.

बाळासाहेबांनी निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन केलं. पण उद्धव ठाकरेंनी केले नाही, असा युक्तिवाद शिंदेंच्या वकिलांनी केला.

# एसआयआरच्या यादीत नाव न सापडल्याने घाबरू नका; मतदारांनी पडताळणी करून दावा दाखल करावा

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०२, पनवेल (नवी मुंबई) :** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान कोकण विभागातील सुमारे ७९ लाख मतदार सध्या न सापडल्याचे समोर आले आहे. या मतदारांची प्रारूप यादी प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित मतदारांनी घाबरून न जाता यादीत आपले नाव तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त तथा एसआयआर निरीक्षक रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

कोकण विभागातील ७५ मतदारसंघांमध्ये एकूण २ कोटी ४७ लाख ६२ हजार मतदार आहेत. एसआयआर प्रक्रियेत मतदारांच्या नावांची पडताळणी करताना त्यापैकी सुमारे ७९ लाख मतदार सध्या सापडलेले नाहीत. या मतदारांची प्रारूप यादी सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांच्या तसेच कोकण विभागाच्या संकेतस्थळावर नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मात्र, प्रारूप यादीत नाव आढळले नाही म्हणजे मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आले आहे, असा अर्थ काढू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पात्र मतदारांनी यादी तपासून आपले नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करावी.




**नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म क्रमांक ६**

मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्याची आवश्यकता असलेल्या पात्र नागरिकांनी विहित नमुना फॉर्म क्रमांक ६ भरून संबंधित मतदान नोंदणी अधिकारी कार्यालयात सादर करावा. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करून मतदारांनी आपली नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, एसआयआर प्रक्रियेदरम्यान नागरिकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे मतदार यादीत नावाबाबत कोणतीही अडचण, दुरुस्ती किंवा हरकत असल्यास संबंधितांनी मुदतीपूर्वी अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

**कुटुंबातील प्रत्येक पात्र मतदाराचे नाव तपासा**

नागरिकांनी केवळ स्वतःचेच नव्हे, तर आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत का, याचीही खात्री करावी. यादीत नाव न आढळल्यास घाबरून न जाता आवश्यक कागदपत्रांसह दावा दाखल करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोकण विभागातील मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी नागरिकांनी एसआयआर प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

**मुंबई शहर व उपनगरासाठी स्वतंत्र निरीक्षक**

एसआयआर प्रक्रियेसाठी कोकण विभागातील पाच जिल्ह्यांची जबाबदारी विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांच्याकडे निरीक्षक म्हणून सोपविण्यात आली आहे. तर मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# मनसेचा करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय!

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०२, पंढरपूर :** करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत महावितरणच्या वतीने उभारण्यात आलेले डीपी (ट्रान्सफॉर्मर), विजेचे खांब (पोल), सब-स्टेशन तसेच उच्चदाबाच्या वीजवाहिन्यांमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे होणारे नुकसान याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. महावितरण कडून खासगी शेतजमिनीमध्ये डीपी, विजेचे खांब, सब-स्टेशन उभारले असल्यास अथवा उच्चदाबाच्या वीजवाहिन्या गेल्या असल्यास, जमिनीचा वापर व कायमस्वरूपी होणाऱ्या नुकसानीपोटी 'राईट ऑफ वे' कायद्याअंतर्गत नुकसानभरपाई व योग्य मोबदला मागण्याचा कायदेशीर अधिकार शेतकऱ्यांना आहे. मात्र, या कायद्यांतर्गत मिळणाऱ्या भरपाईबाबत योग्य माहिती व मार्गदर्शन न मिळाल्यामुळे अनेक शेतकरी आपल्या हक्काच्या मोबदल्यापासून वंचित राहत आहेत. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने करमाळा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकऱ्यांच्या शेतात लागलेले पोल, डीपी, सब-स्टेशन किंवा गेलेल्या वीजवाहिन्यांमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला व भरपाई मागण्यासाठी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे रीतसर अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यासाठी मनसेच्या वतीने शेतकऱ्यांना मोफत अर्जाचा नमुना तसेच कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आपल्या शेतातील डीपी, पोल, सब-स्टेशन किंवा विजेच्या तारांमुळे होणाऱ्या नुकसानीचा मोबदला महावितरणकडून कसा मिळवायचा आणि त्यासाठीचा अर्ज कसा करायचा, याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना करमाळा तालुकाध्यक्ष संजय (बापू) घोलप यांच्या वतीने शेतकऱ्यांना मोफत अर्ज उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच अर्ज भरल्यापासून तो महावितरण कार्यालयाकडे सादर करेपर्यंत आवश्यक असलेले कायदेशीर मार्गदर्शन मनसे विधी व न्याय कक्षामार्फत मोफत देण्यात येणार आहे. यासाठी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून महावितरणच्या वीजवाहिन्या गेल्या आहेत किंवा शेतात खांब, डीपी बसविण्यात आले आहेत, अशा सर्व शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या भरपाईसाठी मनसे करमाळा तालुका व शहर पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन घोलप यांनी केले आहे. तसेच मनसे विधी व न्याय कक्ष ॲड. मनोजकुमार कांबळे, ॲड. निखिल मांगले, ॲड. अर्पणा पदमाळे, यांचेशीही संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# लासलगाव पोलिसांची धडक कारवाई; अपहृत अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** नाशिक ग्रामीण हद्दीत महिला व बालकांवरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विशेष मोहिम अंतर्गत लासलगाव पोलिसांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून जलद गतीने तपासचक्रे फिरवत पोलिसांनी एका अपहृत अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका केली. या गंभीर गुन्ह्यातील दोन संशयित आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

लासलगाव पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजिस्टर क्रमांक १७८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १३७(२), वाढीव कलम ६४, ६५(१), ८७, ९६, ३(५) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो – झजउडज) कायद्यातील कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम. आणि निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांनी तपासाबाबत विशेष सूचना व मार्गदर्शन दिले होते.

वरिष्ठांच्या आदेशानुसार लासलगाव पोलिसांच्या एका विशेष पथकाने विविध ठिकाणी कसून शोधमोहीम राबवली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने संशयितांचा माग काढून मुलीची सुरक्षित सुटका केली आणि दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मंजूर केली.

सदर यशस्वी कारवाई लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंके, पोलीस हवालदार अरुण डोंगरे, पोलीस शिपाई शशिकांत निकम, संदीप डगळे, सागर आरोटे, अविनाश सांगळे आणि चालक कैलास घोलप यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंके करत आहेत.

# अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ मूक मोर्चा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** जळगाव जिल्ह्यातील शिवरे ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी स्व. पीं. एन. पाटील यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने चंद्रपुरात भव्य मुक मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषद ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात जिल्ह्यातील शेकडो अधिकारी सहभागी झाले होते. अधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. दोषींवर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे ग्रामपंचातमध्ये कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी स्व. पी. एन. पाटील यांच्यावर कर्तव्यावर असताना जमावाकडून झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या आणि त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या घटनेच्या तीव्र निषेधार्थ महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन जिल्हा शाखा चंद्रपूरच्या वतीने जिल्हा परिषद ते जिल्हाधिकारी कार्यालयावर फव्य मूक मोर्चा काढण्यात आला. १७ ऑगस्ट २०२६ रोजी शिवरे ग्रामपंचायतीची नियॅति ग्रामसभा सुरु असताना जमावाने केलेल्या अमानुष मारहानीमुळे आणि प्रचंड मानसिक व शारीरिक त्रासामुळे ह्दयविकाराचा तीव्र झटका येऊन पाटील यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला होता. या धक्कादायक घटनेमुळे राज्यभरातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गात प्रचंड भिती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, राज्य कार्यकारिणीच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांनी १८ ऑगस्टपासून ग्रामसभा कामकाजावर पुकारलेला बहिष्कार आजही ठामपणे सुरु ठेवला आहे.




## भगवान श्रीकृष्णाची महिमा अपरंपार

श्रावण कृष्णपक्ष अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव संपूर्ण भारतात गोकुळ अष्टमी किंवा श्रीकृष्ण जन्माष्टमी या नावाने मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केल्या जातो.पौराणिक कथेनुसार कृष्णाचा जन्म मथुरा येथे वासुदेव आणि देवकीच्या पोटी झाला. तेव्हा या दोघांना कंसाने बंदीस्त करून ठेवले होते. कंस हा अहंकारी राजा होता. त्याच्या अहंकाराने प्रजा अत्यंत त्रस्त होती. अशा परिस्थितीत आकाशवाणी होते. त्यात कंसाला सांगितले जाते की हे कसं तुझा शेवट देवकीचा आठवा पुत्र करेल. आकाशवाणीमुळे कंस भयभीत होतो आणि वासुदेव व देवकीला बंदीस्त करतो. अशा परिस्थितीत देवकीला सात पुत्र होतात त्यांचा सर्वांचा वध कंस करतो. यात आठवा पुत्र श्रीकृष्ण वाचतो आणि पुन्हा आकाशवाणी होते हे कंसा ज्याच्या हातांनी तुझा मृत्यू होणार आहे त्यांनी जन्म घेतलेला आहे सावधान! महाभारत ही पौराणिक कथा आहेच. परंतु आपल्या जीवनात घडणारे प्रसंग सुध्दा आहेत. जन्माष्टमीचा सण श्रावण महिन्यातील कृष्णपक्षातील अष्टमीला साजरा करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. श्रावण महिन्यांतील कृष्णपक्षातील अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. जन्माष्टमीच्या दिवशी लोक भक्तिभावाने उपवास करून पुजाअर्चना करतात व श्रीकृष्णाच्या जन्म ोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो.हा उपवास नवमीला संपतो. संपुर्ण भारतात आपल्याला जन्माष्टमीचा अनेक मोठ-मोठे कार्यक्रम पहायला मिळतात.या निमि त्ताने मोठ्या प्रमाणात दहिहंडीचे कार्यक्रम दिसून येतात. अनेक बालगोपाल (गोविंदा)या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करतात. जन्माष्टमीच्या दिवशी अनेक भाविक श्रीकृष्णाची स्थापना करतात व मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते. कोणाकडे श्रीकृष्ण (काणोबा) दिड दिवसांचा असतो तर कोणाकडे पाच दिवसांचा असतो. या कालावधीत पुजाअर्चना करून आपली मनोकामना पूर्ण करण्याचे साकडे भक्तगण घालतात व विसर्जनाच्या दिवशी घरगुती दहिहांडी फोडून काला करतात आणि सर्वांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो. भगवान श्रीकृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत.अहंकारी कंसाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी श्रीकृष्णावतार धारण केला व कृष्णाने मामा कंसाचा वध केला. ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण लहाण्याचे मोठे झाले ते ठिकाण म्हणजे उत्तर प्रदेशातील (मथुरा-वृंदावन) याठिकाणी जन्माष्टमीला मोठे उत्साहाचे आनंदाचे वातावरण असते. भारतातील संपूर्ण श्रीकृष्ण मंदिरांची सजावट करून मोठ्या थाटामाटात उत्सव साजरा केला जातो. भारतातील जगप्रसिद्ध मथुरा आणि वृंदावनमधील सर्व श्रीकृष्ण मंदिरे पहाण्यासाठी देशातील तसेच जगाच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण व पर्यटक इथे येऊन श्रीकृष्णाचे दर्शन घेतात. गुजरातमधील व्दारका येथे एक वेगळा उत्सव साजरा केला जातो या ठिकाणी कृष्णाने आपले राज्य स्थापन केले होते. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये जन्माष्टमीच्या दरम्यान दही हंडीचे कार्यक्रम करून उत्सव साजरा करतात.त्याचप्रमाणे गुजरात मधील कच्छ जिल्ह्यातील शेतकरी बैलगाड्या सजवून त्यावर भगवान श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून नाचत-गाजत मिरवणुक काढतात.अशाप्रकारे संपूर्ण भारतात जन्माष्टमी आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. महाभारतात श्रीकृष्णाने सत्याची बाजू घेत शेवटपर्यंत अर्जुनाचे सारथी रहाले.बाळ श्री कृष्ण दही आणि लोणी नेहमी खायचा त्यांचे आवडीचे प्रतीक आणि आपल्यासाठी प्रसाद म्हणून म हाराष्ट्रात दहीहंडीची प्रथा आहे.जन्माष्मी भारतातच नाही तर जगातील अनेक देशांतील भारतीय श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या थाटामाटात साजरी करतात. कारण भारतातील संस्कृतीने अनेक देशांना बरेच काही दिले आहे. देवकी मानवी देहाचे प्रतीक मानले जाते तर वासुदेव प्राणशक्तीचे प्रतीक आहे.मानवी देहामध्ये जेव्हा प्राणशक्ती वृध्दिंगत होते तेव्हा भगवान श्रीकृष्णाची म्हणजे आनंदाची अनुभूती प्राप्त होते. त्यामुळे आपल्याला सर्वत्र मंगलमय वातावरण दिसून येते. सृष्टीचे पालनहार म्हणजे विष्णूचे आठवे अवतार भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मत्सोवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगत आहे.यामुळे प्रत्येक सणासुदी वृक्षलागवड काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे श्रीकृष्णाचा सहवास नेहमीच बालगोपालांसोबत वृक्षांच्या सानिध्यात रहायचा. त्यामुळे आज आपणास सर्वांवर ती वेळ येऊन ठेपली आहे की वृक्ष बिना जीवन अधुरे आहे. यामुळे आज वृक्ष लागवड अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल, गुरांना चारा उपलब्ध होईल, ऑक्सिजनची मात्रा वाढेल व संपूर्ण भारत भुमि (सृष्टी) प्रफुल्लित राहील आणि निसर्गाची व पृथ्वी मातेची रक्षा करण्यास मोठी मदत होईल. गोकुळ अष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा!

**– रमेश लांजेवार**

# फुटबॉलच्या आकाशातील तेजस्वी तारा; लिओनेल मेस्सी

जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी ३१ ऑगस्ट २०२६ हा दिवस भावूक करणारा ठरला. अर्जे टिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याने तब्बल दोन दशकांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीनंतर राष्ट्रीय संघातून निवृत्ती जाहीर केली. मेस्सीने संपूर्ण फुटबॉलला अलविदा केलेला नसून, त्याचा हा निर्णय केवळ अर्जे टिनाच्या राष्ट्रीय संघापुरता आहे. तो इंटर मियाम ीकडून क्लब फुटबॉलमध्ये खेळत आहे.

रोझारियोच्या मातीतून फुटबॉलच्या विश्वात आलेल्या मेस्सीने आपल्या अद्भुत कौशल्याने, अचूक पासिंगने, वेगवान ड्रिब्लिंगने आणि गोल करण्याच्या विलक्षण क्षमतेने जगाला अक्षरशः मंत्रमुग्ध केले. २००५ मध्ये अर्जेंटिनाकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर त्याने २०७ सामने खेळत १२५ गोल केले. तो अर्जेंटिनाचा सर्वाधिक सामने खेळणारा आणि सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला.



मेस्सीच्या कारकिर्दीत यशाबरोबरच अपयशाचीही अनेक पाने होती. २०१४ च्या विश्वचषकातील अंतिम सामन्यातील पराभव आणि कोपा अमेरिका स्पर्धेतील अपयशानंतर त्याच्यावर मोठी टीका झाली. मात्र त्याने हार मानली नाही. २०२१ मध्ये कोपा अमेरिका, २०२२ मध्ये कतार विश्वचषक आणि २०२४ मध्ये पुन्हा कोपा अमेरिका जिंकून त्याने टीकाकारांना आपल्या कामगिरीने उत्तर दिले. २०२२ च्या विश्वचषक विजयाने तर त्याच्या कारकिर्दीला सुवर्णमुकुट मिळाला.

२०२६ च्या विश्वचषकातही मेस्सीने अर्जेंटिनाला अंतिम फेरीपर्यंत नेले. मात्र स्पेनविरुद्धच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाला पराभव पत्करावा लागला. त्यानंतर मेस्सीने राष्ट्रीय संघातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. वयाची ३९ वर्षे, प्रदीर्घ कारकीर्द आणि नव्या पिढीला संधी देण्याची वेळ आली आहे, या जाणिवेतून त्याने हा निर्णय घेतला.

मेस्सीचे महत्त्व केवळ त्याने केलेल्या गोलांमध्ये किंवा जिंकलेल्या पदकांमध्ये नाही. संघर्षातून यश मिळवता येते, टीकेला संयमाने उत्तर देता येते आणि अपयशानंतर पुन्हा उभे राहता येते, हा संदेश त्याने जगातील लाखो तरुणांना दिला. आठ वेळा बॅलन डी'ऑर पुरस्कार मिळवणाऱ्या मेस्सीने फुटबॉलच्या इतिहासात स्वतःचे असे स्थान निर्माण केले आहे, जे पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

मेस्सीचा अर्जेंटिनाच्या जर्सीतील प्रवास आता संपला असला तरी त्याच्या पायातील जादू आणि मैदानावरील आठवणी कायम राहतील. अर्जेंटिनासाठी त्याने दिलेले योगदान, देशाला मिळवून दिलेली विश्वचषकाची ऐतिहासिक भेट आणि फुटबॉलप्रेमींच्या मनात निर्माण केलेली असंख्य अविस्मरणीय क्षणे यामुळे मेस्सी हा केवळ एक महान खेळाडू नव्हे, तर फुटबॉलच्या इतिहासातील एक अमिट अध्याय म्हणून सदैव स्मरणात राहील.

मेस्सी राष्ट्रीय संघातून निवृत्त झाला आहे; पण त्याची जादू अजून संपलेली नाही. मैदानावरील त्याच्या पावलांचे ठसे पुसणे फ ुटबॉलच्या इतिहासालाही शक्य होणार नाही.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मूर्त्यांची वाढती उंची चिंताजनक !

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या जुलमी धोरणाप्रती जागृती करण्याच्या उद्देशाने जनतेला एकत्र आणण्यासाठी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेश उत्सव सुरू करण्याला आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेश उत्सव साजरा करण्याला आता शंभराहून अधिक काळ लोटत आला असावा. या शतकीय वाटचाली दरम्यान सार्वजनिक गणेश उत्सवात बरेच बदल घडून आलेत. तंत्रज्ञान वाढले आणि याचा पुरेपूर फायदा गणेश मंडळांनी घेतला. अजूनही काही गणेश मंडळे भारतीय संस्कृती आणि गणेश उत्सवाचे अध्यात्मिक महत्त्व जपत पर्यावरणपूरक कार्यक्रम घेऊन, रक्तदान, सामान्य ज्ञान स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, साहसी खेळ, मैदानी खेळ स्पर्धा घेऊन जनजागृतीचे कार्य करतात. त्यांचे खरेच अभिनंदन करायला पाहिजे. मात्र, काही गणेश मंडळांत गेल्या काही काळांपासून जणू काही स्पर्धा चालल्यागत वातावरण निर्माण झाले आहे आणि हे वातावरण गणेश उत्सवाचे मूळ रूप हरवून मंडळांच्या कार्यकर्त्यांना जसे हवे, त्याप्रमाणे आयोजन केले जात आहे. यातून गणेश मूर्तींची वाढत चाललेली उंची देखिल सुटलेली नाही. अशावेळी खुद्द मूर्तिकार असलेले अरुण दाते यांनी गणपतीच्या मूर्तींच्या उंचीवर निर्बंध आणायला हवेत! असे केलेले विधान मंडळांनी विचारात घ्यायला पाहिजे.

नुकतेच २३ ऑगस्ट रोजी मुंबईतील भुलेश्वर भागात येणाऱ्या गणपती उत्सवाची तयारी म्हणून गणरायाची २२ फूट उंच मूर्ती वाजत गाजत मंडपात नेत असतांना घडलेल्या दुर्घटनेत २ जण ठार झालेत तर पाच जण जखमी झालेत. या दुर्घटनेनंतर मात्र बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने दुखवटा जाहीर केला असून, आगामी आगमन मिरवणुकीत वाजंत्री आणि इतर कोणत्याही प्रकारचा जल्लोष करू नये, असे आवाहन केले आहे. राज्यात सध्या सर्वत्र रस्त्यांवर मेट्रो, पूल वगैरेचे बांधकाम सुरू असल्याने जागोजागी गतिरोधक बसविलेले आहेत.शिवाय राज्यातील बहुतांश ठिकाणी रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. याकडे सरकारचे लक्ष नाही, असेही नाही. यामुळे बहुदा मूर्तीची बांधणी खिळखिळी होऊन मूर्ती कोसळल्याची शंका व्यक्त केल्या जात आहे. सुखकर्ता दुःखहर्ता म्हणून ज्या गणरायाला ओळखले जाते, पूजल्या जाते. त्याच गणरायाच्या आगमना प्रसंगी अशी दुर्दैवी घटना घडणे म्हणजे एक प्रकारे उत्सवांत वाढत चाललेली स्पर्धा, मूर्तींची अनावश्यक वाढत चाललेली उंची, डॉल्बीचा कर्णकर्कश आवाज आणि मिरवणुकी दरम्यान असलेला कार्यकर्त्यांचा अतिउत्साह यास सावध होण्याचा जणू काही संकेतच म्हणावा लागतो. विशेष म्हणजे या दुर्घटनेनंतर सुद्धा मुंबईतील उंच मूर्तींना कर्नाटक,गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान सारख्या राज्यांतून प्रचंड प्रमाणात मागणी वाढली असून एका माहितीनुसार यंदा २ हजारांपेक्षा अधिक मूर्त्या परराज्यांत रवाना होणार आहेत. आता काही मंडळांनी प्रवासाच्या दृष्टीने बैठ्या मूर्तींना पसंती दर्शवली आहे, हे तरी बरे.

गेल्या काही काळाचा विचार करतो म्हटले तर मिरवणुकींचे पारंपरिक स्वरूप बदलून त्यात अवाढव्यता वाढीस लागली आहे. एखाद्या म ोहर्रम निमित्त निघणाऱ्या डोल्यांचे मनोरे सुद्धा आता अधिक मजली व्हायला लागले आहेत. कित्येक शोभायात्रांत एकावर एक डॉल्बी लावून उंच थर रचला जातो. भारतात हैदराबादमधील खैरताबादचा गणपती त्याच्या सुमारे ६० ते ७० फूट अशा अवाढव्य उंचीसाठी प्रसिद्ध आहे. अनेक ठिकाणी गणपती, देवींच्या मूर्तींची उंची तीस, चाळीस फूट अशी व्हायला लागली आहे. जणू, दैवतांना पाच फूट, दहा फुटांची उंची म ान्यच नसावी. काहींच्या मते हा विरोध विशिष्ट




धर्मीयांच्या उत्सवातच का? तर, हा विरोध उत्सवाला नसून त्यात होत असलेल्या आततायी गोंधळाला आहे. उत्सवाच्या माध्यमातून होत असलेल्या राजकारणाला आहे. आपणच विचार करायला हवा की, या गोष्टी गणरायाला सुद्धा मान्य असतील काय? काही काळापूर्वी लहान आकाराच्याच मूर्त्या बसविण्यात येत होत्या ना! मग,त्यावेळी अध्यात्मिक भाव नव्हता काय?

राज्यात आधीच अर्ध्याधिक रस्त्यांचे बांधकाम सुरू असतांना जागोजागी गतिरोधक बसविलेले आहेत. त्यातल्या त्यात रस्त्याच्या दुतर्फा बनविलेले पादचारी मार्ग राहत्या लोकांनी आणि व्यावसायिकांनी गिळंकृत केल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. अगदीच बोळ म्हणावी असे रस्ते वाटायला लागले आहेत. त्यातल्या त्यात याच रस्त्यांवर दुतर्फा लावण्यात येणारी वाहने रहदारीला अडथळा ठरतात. शहरात आणि गावोगावी वाढलेले केबलचे जाळे प्रत्येक चौकाचौकांत दिसून येईल. अशावेळी स्पर्धा करून आपण मूर्तींची उंची अधिक ठेवण्याचा अट्टाहास धरत असू तर त्या मूर्तींची मिरवणूक काढतांना किती त्रास होतोय, याचा अंदाज तरी लावायला हवा. या दरम्यान होणारा वाहतुकीचा खोळंबा आणि मिरवणुकीत वाजणारे डॉल्बी यामुळे नवजात बालकांसह आजारी व्यक्तींचे काय हाल होत असतील याचा तरी विचार करायला हवा. उत्सव एकदाच असतो, हे मान्य केले तरी असे सर्वधर्मीय उत्सव हल्ली दर महिन्याला होत असतात. यातून जनतेला वेठीस धरण्याचा हक्क आपणास कुणी दिला? उत्सव तर आनंदाचा सोहळा असायला हवा, न की त्यात कुणाच्या घरातील आधार हरवला जावा. आता तर राजकारण्यांनी अनेक उत्सव काबीज केल्याने ते स्वतःच यात सहभागी असतात. दहीहंडी आयोजित करून उंचच उंच थरांचे मनोरे उभारले जातात. मात्र, दरवर्षी या उत्सवात कितीतरी गोविंदा जखमी होतात आणि कितीतरी युवांना आपले प्राण गमवावे लागते. पर्यायाने कार्यकर्त्यांना उधाण येऊन अशा विघ्नांत अधिकच भर पडली जाते. एकीकडे पर्यावरणाच्या दृष्टीने पीओपी मूर्त्यांवर बंदी आणली जाते आणि दुसरीकडे दैवतांच्या मूर्तींची उंची वाढवली जाते, हे योग्य तरी आहे काय? यामुळे काही मूर्तिकार, अन्य व्यावसायिक यांचा फायदा होतो हे नक्की असले तरी लहान मूर्त्या बसवून वाचलेला पैसा इतर मनोरंजन, स्पर्धा, सामाजिक कार्ये यात खर्च केला तर बिघडणार आहे काय? कायदे आहेत, मात्र त्याचा धाक नावापुरता मर्यादित असल्याने दिवसेंदिवस मूर्तींची उंची वाढणे, ढोल ताशांच्या ऐवजी कर्णकर्कश डॉल्बी, मर्यादेपेक्षा अधिक गोविंदाचे थर या गोष्टी सहज घडायला लागल्या आहेत.

भुलेश्वर भागातील घटनेची शाई नाही वाळत ते ठाण्यातील मुंब्रा परिसरातील गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या ट्रॉलीचे चाक अचानक घसरले. कार्यकर्त्यांनी वेळीच प्रसंगावधान राखल्याने पुढील दुर्घटना टळली. मात्र, तरीही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोठ मोठ्या मूर्त्या बसविण्याचा अट्टाहास सोडायला हवा. पुणे पोलिसांनी आता मिरवणुकीत वापरण्यात येणारे प्लाझ्मा आणि लेजर किरण यावर पूर्णतः बंदी घातली आहे. मात्र, मंडळांच्या कार्यकर्त्यांनी ही बाब मनावर घेणे गरजेचे आहे. पुण्यात ५०००० हून अधिक सार्वजनिक गणपती बसतात. यातील जवळपास २०० गणेश मंडळांनी यंदा डीजेमुक्त गणपती उत्सव साजरा करण्याचा निर्धार केलेला आहे. या निर्धाराचे सर्वत्र अनुकरण व्हायला हवे. या निर्धाराचे कौतुक व्हायला पाहिजे. नागपुरात सुद्धा नुकत्याच झालेल्या समन्वय बैठकीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, तरीही मूर्तींची उंची वाढत जात असेल तर चित्र चिंताजनकच समजावे.

**लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**
**८४१२८७७२२०**

## नियोजन

दहीहंडी गणेशोत्सव
सर्वत्र करे आयोजन
राजकारण डोकावते
कळते स्पष्ट प्रयोजन

विविध पक्ष सरसावे
शिस्त बध्द नियोजन
लक्षात राही सोहळा
रे पुढे कितीक योजन

भक्तीचा दिसे देखावे
जाणवे शक्ती प्रदर्शन
प्रति पक्षाचा वेध घेते
खास चक्र ते सुदर्शन

जाहिरात मोठमोठ्या
समोरआणले व्हिजन
निमीत्त स्नेह सोहाळां
जवळ आणले स्वजन

सेलिब्रिटी दिसे सर्वत्र
जोरात करे मनोरंजन
मागचा हेतू जाणवतो
डोळ्या घातले अंजन

जागोजाग मुफ्त चाले
किर्तन नर्तन न् भजन
विचकले प्रसिद्ध दात
अदृश्य लपलेले मंजन

आंतरराष्ट्रीयदर्जा हवा
गांभीर्ये विचार मंथन
प्रयास व्हावे सर्व स्थरे
रे पुरातन वारसाजतन

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# आरोग्य दायी पदार्थांचा सरकारी पातळीवर अंतर्भाव ..... महत्वपूर्ण निर्णय

महाराष्ट्र मंत्रिमंडळाची मंगळवारी बैठक झाली होती. त्या बैठकीत सरकारी बैठक कार्यक्रमातून यापुढे चहा बटाटेवडे, बिस्किटे पुरवली जाणार नाहीत.

आरोग्यदायी पदार्थांचा मेनू सरकारी बैठका, कार्यक्रम, प्रशिक्षण संस्था, परिषदा, तसेच उपहारगृहात अल्पोपहार किंवा भोजन देताना त्यात सफरचंद, केळी, पपई, पेरू उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली सांबार कोशिंबीर, विविध भाज्या भाकरी इत्यादी पदार्थ द्यावेत असे बंधन घालण्यात आले आहे. ताक तसेच साखर विरहित ग्रीन टी, गरम दूध म



ागणीनुसार द्यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. चहा कटाप करण्यात आला आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली.

अल्पोपाहारात तेलकट पदार्थांचा समावेश करू नये असे ठरविण्यात आले आहे. संबंधित कार्यालयामध्ये नवीन खानपान करारामध्ये आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एकूणच महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय क्रांतिकारी व कर्मचाऱ्यांच्या हिताचा आहे. चहा अशा मेनूमधून वगळला असल्यामुळे काही दिवस अवघड जाणार आहे पण हळू हळू त्याची सवय होईल असे वाटते वडे, तसेच चमचमीत पदार्थ यापुढे दिले जाणार नाहीत महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय क्रांतिकारी आहे. कर्मचाऱ्यांचे आरोग्य, लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असावा.

**– शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# डॉ. प्रताप इघे जीवनरक्षक पुरस्काराने सन्मानित




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याचे सुपुत्र डॉ.प्रताप प्रकाशराव इघे यांचा पुणे येथील सुसंगत फाऊंडेशनच्यावतीने जीवनरक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.सुधाकर न्हाळदे, सेवानिवृत्त आरोग्य डॉ. प्रदीप आवटे, डॉ. सदानंद राऊत अहिल्यानगर लोहार समाज संघटनेचे नेते प्रकाशराव इघे, राहिबाई इघे, व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ.इघे यांचे प्राथमिक शिक्षण तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे झाले. लोहार समाजातील हा तरुण आपल्या इच्छाशक्ती च्या जोरावर प्रचंड मेहनत करून वैद्यकिय शिक्षण पूर्ण करून पुणे जिल्ह्यातील खेड या ठिकाणी व्यवसाय करत असताना कायम गरजूंना मदत करत. त्यांनी अवघड समजल्या जाणाऱ्या अनेक शस्त्रक्रिया यशस्वी करून शेकडो रुग्णांचे प्राण वाचवले. तसेच विविध सामाजिक उपक्रमामध्ये ते नेहमी भाग घेत त्यांच्या याच कामाची दखल घेत त्यांचा सन्मानित केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांचे पारनेर खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बाबासाहेब खिलारी, सरपंच बाळासाहेब खिलारी लोहार समाज संघाचे राज्य अध्यक्ष संदीप थोरात, लोहार समाज महासंघांचे उपाध्यक्ष दशरथ पोपळघट, माजी नगरसेवक संतोष पोपळघट, अहिल्यानगर लोहार समाज संघटनेचे अध्यक्ष भास्कर पोपळघट, पुणे जिल्हा अध्यक्ष भरत थोरात, निवृत्ती पोपळघट यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.

# वडगाव सावताळच्या तीन शिक्षिकांची पवित्र पोर्टलद्वारे निवड; वडगाव सावताळ ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** वडगाव सावताळ (ता.पारनेर) येथील तीन शिक्षिकांची महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक पदावर निवड झाल्याबद्दल वडगाव सावताळ ग्रामस्थ व विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे, संचालक मंडळ व ग्रामस्थांच्या हस्ते सत्कारकरण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती वैष्णवी दादाभाऊ रोकडे, श्वेता दादाभाऊ रोकडे आणि सुवर्णा लक्ष्मण खामकर यांचा सत्कार करत गौरव करण्यात आला. गावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या क्षेत्रात या तिन्ही शिक्षिकांच्या निवडीमुळे वडगाव सावताळच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सत्कार सोहळ्यास माजी सरपंच राजेंद्र रोकडे, ज्ञानदेव शिंदे, कर्ण रोकडे सर, भाऊसाहेब खामकर, हनुमंत ठाणगे, पंढरीनाथ व्यवहारे, माजी चेअरमन दादाभाऊ रोकडे, दादा रोकडे, माजी चेअरमन राजेंद्र भोसले, ज्ञानदेव खामकर, लक्ष्मण खामकर, की.पा.रोकडे गुरुजी, बाबासाहेब लोखंडचुर, विजय रोकडे, संतोष रोकडे, सिताराम रोकडे, नामदेव व्हावळ, किसन रोकडे, संभाजी रोहकले, बाजीराव रोकडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# फुरसुंगी - उरुळी देवाची कचरा डेपो बाबत महत्त्वाची बैठक



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०२, फुरसुंगी (पुणे) :** पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय येथे संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे, पुणे महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत फुरसुंगी – उरुळी देवाची कचरा डेपोच्या समस्यांबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत ग्रामस्थांनी काही मुद्दे उपस्थित केले.

१) नव्याने होणा-या ५०० मे. टन कचरा प्रकल्पास ग्रामस्थांचा विरोध असेल.

२) चिकन व मटण वेस्ट प्रकल्पास कडाडून विरोध!

३) उरुळी देवाची हद्दीतील स. नं. ३१ येथील गार्डन आरक्षित जागेवरील गार्डनवेस्ट प्रकल्पास विरोध असून त्या जागेवर जॉगिंग ट्रॅक व गार्डन उभारण्यात यावे अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

४) मुख्याधिकारी नगरपरिषद व कृती समितीने मागण्या लेखी स्वरूपात सादर करेपर्यंत कचरा प्रकल्प स्थगित ठेवण्यात येईल असे बैठकीत ठरविण्यात आले.

सदर बैठकीस पुणे महानगरपालिका सभागृह नेते, फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सभागृह नेते, नगरसेवक व मुख्याधिकारी तसेच कृती समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** दि एज्युकेशन सोसायटी, चंद्रपूर द्वारा संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर येथे दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचे स्मरण करण्यात आले.

प्राचार्या बैद मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनातून, भारताच्या क्रीडा क्षेत्राला जागतिक स्तरावर गौरव मिळवून देणारे मेजर ध्यानचंद हे विद्यार्थ्यांसाठी मेहनत, शिस्त, समर्पण आणि जिद्दीचे प्रेरणास्थान असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यापुढे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, नियमित व्यायाम व खेळाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली अंगीकारावी, तसेच खेळातून शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करावा, असे आवाहन केले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी खेळाची भावना जपण्यासोबतच नियमांचे पालन, खिलाडूवृत्ती, आरोग्यदायी जीवनशैली आणि क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला.

# सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत वाहतुकीकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल!

## कल्याण फाटा आणि शिळफाटा येथे सिग्नल यंत्रणेचे लोकार्पण



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, शिळफाटा (ठाणे) :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि शहरप्रमुख तथा माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते आज कल्याण फाटा जंक्शन (शिक्षण महर्षी नारायण शेठ पाटील चौक) आणि शिळ फाटा येथे आधुनिक वाहतूक सिग्नल यंत्रणेचा शुभारंभ करण्यात आला. हा कार्यक्रम शिळफाटा वाहतूक विभागाचे PSI केंद्रे साहेब यांच्या उपस्थितीत पार पडला.

कल्याण फाटा – शिळ फाटा हा परिसरातील अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा चौक असून येथे वाढती वाहतूक, नागरिकांची ये–जा आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन ही यंत्रणा बसवण्यात आली आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चनाताई पाटील यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली लोढा बिल्डरने पुढाकार घेऊन ही अत्याधुनिक यंत्रणा उभारली आहे.

वाहतूक व्यवस्थेत शिस्त निर्माण व्हावी, वाहनचालकांना सुरक्षित प्रवास करता यावा, पादचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी आणि वाहतूक कोंडी कमी व्हावी या उद्देशाने हे काम करण्यात आले असून, या यंत्रणेमुळे वाहतूक अधिक नियंत्रित होईल आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित व सुलभ होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ही यंत्रणा नियमित सुरळीत राहावी यासाठी प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी दक्षता घ्यावी असे आवाहन करण्यात आले. या कामासाठी लोढा बिल्डर आणि त्यांच्या तांत्रिक टीमचे आभार मानण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर :

डायघर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, ठाणे महानगरपालिकेचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे, नवी मुंबई नगरसेविका सविता सांगळे, आमदार राजेश मोरे, नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चनाताई पाटील, रोहिदास म्हात्रे – उपतालुकाप्रमुख कल्याण, गणेश जेपाल – उपतालुकाप्रमुख, भरत भोईर – माजी उपसभापती, चंद्रभागा म्हात्रे – कल्याण ग्रामीण विधानसभा, चंद्रशेखर आलिमकर उर्फ चंदू आलिमकर – उपशहरप्रमुख ठाणे, वैभव आलिमकर – युवासेना उपशहरप्रमुख, सुंदर आलिमकर – विभागप्रमुख शिळ विभाग, निलेश पाटील – विभागप्रमुख साबे, किसन जाधव – विभागप्रमुख १४ गांव, दीपेश पाटील – विभागप्रमुख खिडकाळी–डायघर, नवनाथ पाटील – संघटक देसाई विभाग, मधुकर पाटील – विभाग संघटक, राजेश पाटील, गणेश मुंडे – विभाग प्रमुख, जयेंद्र पाटील – शाखाप्रमुख भंडार्ली, रवी रसाळ – शाखाप्रमुख कल्याण फाटा, रूपेश भोईर – शाखाप्रमुख शिळगांव, सागर आलिमकर – युवासेना, दिनेश मोरे – शाखाप्रमुख भोलानाथ नगर, विजय कांबळे – शाखाप्रमुख शिळ–ठाकुरपाडा, राहुल पाटील – शाखाप्रमुख खिडकाळी, शरीदास म्हात्रे – शाखाप्रमुख मोठी देसाई, शंकर पाटील – शाखाप्रमुख खार्डी, जयंत वालीलकर – शाखाप्रमुख निर्मलनगरी, तसेच वाहतूक पोलीस विभागाचे अधिकारी, शिवसेनेचे पदाधिकारी आणि खार्डी, शिळ, दिवा, दहिसर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिळफाटा-कल्याणफाटा वाहतूक कोंडीला अखेर ब्रेक!

## अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा कार्यान्वित, माजी आ.सुभाष भोईर यांच्या हस्ते उद्घाटन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२ शिळफाटा (ठाणे) :** शिळफाटा आणि कल्याणफाटा परिसरातील नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीच्या समस्येवर अखेर ठोस उपाययोजना करण्यात आली आहे. मे. लोढा डेव्हलपर्सच्या सहकार्याने उभारण्यात आलेली नवीन आधुनिक सिग्नल यंत्रणा आजपासून कार्यान्वित करण्यात आली असून, यामुळे दररोजच्या कोंडीतून नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

शिळफाटा परिसरात सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या गंभीर समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार सुभाष भोईर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन या प्रश्नाची सोडवणूक करण्याची मागणी केली होती. त्यानंतर या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

या प्रश्नावर भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या माध्यमातून झालेल्या प्रयत्नांनाच यश आले असून, त्याअनुषंगाने लोढा डेव्हलपर्सच्या सहकार्याने शिळफाटा व कल्याणफाटा परिसरात ही अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा उभारण्यात आली आहे.

दरम्यान, या लढ्यात स्थानिक पातळीवरही जोरदार पाठपुरावा करण्यात आला होता. स्थानिक नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी ठाणे महापालिकेच्या महासभेत कल्याणफाटा येथे आधुनिक सिग्नल यंत्रणा बसविण्याची मागणी लावून धरली होती. तसेच त्यांनी ठाणे महापालिका आयुक्त यांना याबाबत लेखी निवेदनही दिले होते. त्यांच्या या पाठपुराव्यालाही अखेर यश आले आहे.

नवीन सिग्नल यंत्रणा कार्यान्वित झाल्याने शिळफाटा–कल्याणफाटा परिसरातील वाहतुकीचे नियमन अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे. मात्र, ही यंत्रणा सुरळीतपणे आणि सातत्याने कार्यरत राहण्यासाठी वाहतूक पोलीस व संबंधित प्रशासनाने आवश्यक देखरेख ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

आज झालेल्या या सिग्नल यंत्रणेच्या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन माजी आमदार सुभाष भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगरसेविका वेदिका साहिल पाटील, दिवा शीळ युवा मोर्चा अध्यक्ष साहिल पाटील, ज्येष्ठ भाजपा पदाधिकारी बाळाराम पाटील, भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, भाजपा ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय भोईर, कल्याण जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश पाटील, भाजप ठाणे शहर जिल्हा अनुसूचित जाती आघाडीचे सरचिटणीस सतीश केळशीकर, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, नाजिया तांबोळी, अभिषेक ठाकूर, फडके पाडा पोलीस पाटील परशुराम पाटील, संजय पाटील, प्रवीण पाटील, प्रसाद पाटील, संतोष आलिमकर, श्याम काठे, अशोक काठे, नितीन म्हात्रे, अजय म्हात्रे, प्रवीण म्हात्रे, कौस्तुभ म्हात्रे, दक्ष नागरिक संघटनेचे सदस्य बाबुराव मुंडे, रवींद्र पाटील प्रवीण पावशे, रमेश राऊत, संतोष पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनापासून पाठपुराव्यापर्यंत आणि पाठपुराव्यातून प्रत्यक्ष कामापर्यंत, नागरिकांच्या दैनंदिन समस्यांना दिलासा देण्यासाठी विकासकामांचा हा प्रयत्न पुढेही असाच सुरू राहील, असे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

# राखीच्या धाग्यातून शांतीचा संकल्प; नशामुक्त भारताचीही घेतली सामूहिक शपथ



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०२, सोलापूर :** रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ–बहिणीच्या प्रेमाचा सण नव्हे, तर पवित्रता, आत्मिक बंध आणि समाजात शांतता प्रस्थापित करण्याचा संदेश देणारा उत्सव आहे. याच भावनेतून ब्रह्माकुमारी लाईट हाऊस सेवाकेंद्रात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास सोलापूर सबझोन इन्चार्ज बी.के. सोमप्रभा दीदी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या समवेत बी.के. सुजाता बहेंन व बी.के. सदीक्षा बहेंन यांची उपस्थिती लाभली. यावेळी सेवाकेंद्रातील सर्व भाई व माताजींना राखी बांधून रक्षाबंधनाचा पवित्र संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लाईट हाऊसचे ब्रह्माकुमार बाळू भाई यांनी केले. त्यानंतर रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना बी.के. सोमप्रभा दीदी यांनी सद्यस्थितीत समाजाला आध्यात्मिक शक्ती, तपस्या आणि शांतीची नितांत गरज असल्याचे सांगितले. प्रत्येकाने अधिकाधिक तपस्या करण्याचा संकल्प करून स्वतःमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात मनःशांतीची गरज वाढली आहे. ब्रह्माकुमारी सेवाकेंद्राच्या माध्यमातून तपस्या, राजयोग आणि शांततेचा अनुभव घेण्याची संधी मिळते. त्याचा प्रत्येकाने लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

यानंतर बी.के. खाडे भाई यांनी 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत उपस्थितांना सामूहिक शपथ दिली. व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी भोग (प्रसाद) वाटप करण्यात आले. रक्षाबंधनाचा आध्यात्मिक संदेश, तपस्येचा संकल्प आणि नशामुक्त भारताची शपथ यामुळे कार्यक्रमाला सामाजिक व आध्यात्मिकतेची अनोखी जोड मिळाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाईट हाऊस परिवारातील सर्व बी.के. भाई व माताजींनी विशेष परिश्रम घेतले.

# मंत्री सरनाईक यांचा निवडणूक प्रक्रियेतील ऐतिहासिक बोगसगिरीवर सर्वात मोठा गौप्यस्फोट

## ५५% मतदान बोगस; ५ लाख १४ हजार मतदारांपैकी तब्बल २ लाख १३ हजार मतदार कायमस्वरूपी बाद

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०२, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर निवडणूक प्रक्रियेतील आणि मतदार याद्यांमधील अभूतपूर्व घोळ आणि प्रशासकीय निष्काळजीपणावर महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेऊन तीव्र संताप व्यक्त केला. मतदार याद्यांच्या एस.आय. आर (SIR) नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेतून समोर आलेल्या अधिकृत आकडेवारीचा हवाला देत, त्यांनी निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तत्कालीन मतदार याद्यांमध्ये ५ लाख १४ हजार ९५५ एकूण मतदार नोंदवले गेले होते.

परंतु, प्रशासकीय छाननी आणि प्रत्यक्ष पडताळणीनंतर त्यातील तब्बल २ लाख १३ हजार ४५ मतदार हे कायम स्वरूपी (१०० टक्के) बोगस असल्याचे सिद्ध झाले असून ते यादीतून वगळण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त ४७ हजार ९०१ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी असून त्यांची सुनावणी व खातरजमा केली जाणार आहे, तर ४८ हजार ३७९ मतदारांच्या नोंदींमध्ये गंभीर तांत्रिक विसंगती आढळली आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की, ५ लाख १४ हजार मतदारांपैकी प्रत्यक्ष वैध मतदार हे केवळ



३ लाखांच्या आसपास उरले असून, एकूण मतदानापैकी तब्बल ५५ टक्के मतदान हे निव्वळ बोगस आणि बनावट नोंदींवर आधारित होते, हे शासनाच्या व निवडणूक आयोगाच्याच कागदपत्रांवरून उघड झाले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर दरम्यान हरकतींची संधी, ४ नोव्हेंबरला होणार अंतिम यादी जाहीर**

२०१९ च्या मतदार यादीतील ४८७ क्रमांकाच्या भागातील ५ लाख ६७ हजार ९७२ मतदारांपैकी ५०.९९ टक्के म्हणजेच तब्बल ५१ टक्के (१ लाख ४२ हजार ६६२ आणि १ लाख ४८ हजार ४०७) मतदारांच्या मॅपिंगचा गंभीर विषय प्रलंबित आहेत.

यासंदर्भात ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत हरकती व सूचना मागवण्यात आल्या असून, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. केवळ दुसऱ्यांवर वा निवडणूक यंत्रणेवर दोषारोप न करता, मंत्री सरनाईक यांनी आपल्या पक्षाच्या स्थानिक यंत्रणेच्या त्रुटींवरही अत्यंत स्पष्ट आणि प्रामाणिक भूमिका मांडली. इतक्या मोठ्या प्रमाणावर बोगसगिरी आणि फसवणूक होत असताना, आमच्या पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या आणि शिवसैनिकांच्या ही बाब वेळीच लक्षात यायला हवी होती. हा बोगसपणा रोखण्यात आमच्या यंत्रणेकडूनही दुर्लक्ष झाले, हे आम्ही नाकारत नाही.

या प्रशासकीय गोंधळामुळे आणि फसवणुकीमुळेच आमचा निवडणुकीत तांत्रिक पराभव झाला; अन्यथा आमचा विजय निश्चित होता. महापालिका आयुक्तांना यासंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार केला गेला, परंतु त्यांनी चौकशीचा केवळ दिखावा केला आणि कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा थेट आरोप मंत्री सरनाईक यांनी यावेळी केला.

**आगामी निवडणुकांसाठी आखणार विशेष रणनीती, मंत्री सरनाईकांचा मास्टर स्ट्रोक प्लान**

भूतकाळातील चुकांमधून धडा घेत भविष्यात असा कोणताही अन्याय खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड इशारा देत मंत्री सरनाईक यांनी आपल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची व शिवसैनिकांची एक तातडीची विशेष बैठक आयोजित केली असल्याचे आणि या बैठकीत त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना कडक सूचना दिल्या असून, ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान चालणाऱ्या हरकत नोंदणी कालावधीत प्रत्यक्ष घरोघरी जाऊन खऱ्या मतदारांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरण्याचे आदेश दिले आहेत.

शिवसेनेची विशेष टीम आता या संपूर्ण प्रक्रियेवर बारीक लक्ष ठेवून काम करणार असून, आगामी काळात कोणत्याही परिस्थितीत मतदारांची फसवणूक होऊ दिली जाणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केला.

# पत्नी व दिराचे वाचविले प्राण; आरोपी पतीला अटक

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** खापरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील सिल्लेवाडा येथील चांदनी चौक परिसरात १ सप्टेंबर मंगळवारला रात्रीच्या सुमारास एका पतीने स्वतःच्या पत्नीसह सख्या भावावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, खापरखेडा पोलिसांच्या डीबी पथकाने समयसूचकता दाखवत घटनास्थळी वेळेवर धाव घेतली व मोठा अनर्थ टळला सदर घटनेत पोलिसांनी आरोपीची पत्नी व दिराचे प्राण वाचविले असून आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत.

असरफ मनोद्दीन राईन वय ३० रा.चांदणी चौक, सिल्लेवाडा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी रात्री असरफ याचे पत्नी आमना हिच्यासोबत काही कारणावरून भांडण झाले. वाद विकोपाला गेल्याने रागाच्या भरात असरफने पत्नीला चाकूने मारण्याचा प्रयत्न केला यावेळी आरोपीचा भाऊ व फिर्यादी मोहम्मद असरत मेनुद्दीन राईन हा आपल्या वहिनीला वाचवण्यासाठी गेला मात्र यावेळी संतप्त झालेल्या असरफने कमरेला खोचून ठेवलेले दोन चाकू काढून स्वतःच्या भावावरही जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान खापरखेडा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप सगने, पोलीस शिपाई आशिष मेश्राम, बादल गिरी आणि शेखर वानखडे हे परिसरात गस्तीवर होते. त्यांना सदर घटनेची माहिती मिळाली. यावेळी क्षणाचाही विलंब न करता आरोपीचे घर गाठले व आरोपी असरफला ताब्यात घेतले खापरखेडा

> **पोलीस नेहमी घटनास्थळी उशिरा पोहोचतात असा सर्वसामान्य आरोप अनेकदा केला जातो, परंतु सदर घटनेत खापरखेडा पोलिस ठाणे डीबी पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परते मुळे दोन लोकांचे जीव वाचले आहेत. खाकी वर्दीतील या देवदूतांनी केलेल्या या धाडसी व समयसूचक कामगिरी चे खापरखेडा व सिल्लेवाडा परिसरात सर्वत्र कौतुक केले जात आहे.**

पोलीस ठाणे डीबी पथकातील पोलिसांच्या समयसूचकते मूळे आरोपीची पत्नी आमना व त्याचा भाऊ मोहम्मद या दोघांचे प्राण वाचले. याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी आरोपीवर कलम ४२५ बिएनएस १३५ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून सूचना पत्र देऊन सोडले.

# पालम तालुक्यात SIR अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करण्याची संधी; ४ नोव्हेंबरला अंतिम यादी

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०२, पालम (परभणी) :** ९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघांतर्गत पालम तालुक्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (डखठ) २०२६ अंतर्गत नुकतीच सर्व मतदान केंद्रांवर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे पालम तालुक्यातील सर्व मतदारांनी आपल्या गावातील अथवा प्रभागातील प्रारूप मतदार यादी तपासून आपले नाव यादीत समाविष्ट आहे की नाही, याची खात्री करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

ज्या पात्र मतदारांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झालेले नाही किंवा मतदार यादीतील नाव, पत्ता अथवा अन्य तपशिलात त्रुटी असल्यास संबंधित मतदारांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म क्रमांक ६, नाव वगळण्याबाबत हरकतीसाठी फॉर्म क्रमांक ७, तर तपशील दुरुस्तीसाठी फॉर्म क्रमांक ८ भरता येणार आहे. हे अर्ज संबंधित बीएलओकडे तसेच भारत निवडणूक आयोगाच्या ऑनलाइन संकेतस्थळावर दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**९६ हजारांहून अधिक मतदारांचे पुनरीक्षण**

दि.२४ ऑगस्ट २०२६ च्या अहवालानुसार पालम तालुक्यात एकूण ९६,०८८ ईएफ फॉर्मचे डाउनलोड, छपाई व वितरण १०० टक्के पूर्ण झाले आहे. यापैकी ८८,४४७ ईएफ फॉर्मचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत डिजिटायझेशन व पडताळणी पूर्ण झाली असून त्याचे प्रमाण ९२.०५ टक्के आहे. तालुक्यातील एकूण ९६,०८८ मतदारांपैकी ७,६४१ मतदार अनकलेक्टेबल म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहेत. यामध्ये १,२४५ मयत, १,९३८ दुबार, ३,५११ कायमस्वरूपी स्थलांतरित, ९४३ अनुपस्थित आणि ४ इतर प्रकरणांचा समावेश आहे. मात्र, या मतदारांची नावे तत्काळ वगळण्यात आलेली नसून संबंधित मतदारांना सुनावणीच्या वेळी आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यानंतर नियमानुसार निर्णय घेतला जाणार आहे. तसेच तालुक्यात १७३ मतदारांच्या अनॉमली आढळल्या असून आवश्यक कागदपत्रे व पुराव्यांच्या आधारे त्यांची पडताळणी केली जाणार आहे. पात्रता सिद्ध झाल्यानंतर संबंधित सहा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून अंतिम मतदार यादीत समावेशाबाबत नियमानुसार निर्णय घेतला जाणार आहे.

**पुयणी, खोरस येथे नवीन मतदान केंद्रे**

मतदार संघातील मतदान केंद्रांच्या पुनर्रचनेनंतर १,३०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या ठिकाणी नवीन मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार पुयणी आणि खोरस येथे प्रत्येकी एक अशी दोन नवीन मतदान केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे पालम तालुक्यातील मतदान केंद्रांची संख्या १०५ वरून १०७ झाली आहे.

प्रारूप मतदार याद्या सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच तहसील कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही मतदारांना प्रारूप मतदार यादी पाहता येणार आहे.

प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक असल्याने मतदारांनी प्रारूप यादीमध्ये नाव, पत्ता, भाग क्रमांक, अनुक्रमांक आणि मतदान केंद्र यांची तपासणी करावी. कोणतीही त्रुटी आढळल्यास अंतिम मुदतीची वाट न पाहता ३० सप्टेंबरपूर्वी दावे, हरकती किंवा दुरुस्तीचे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जीवराज डापकर, उपविभागीय अधिकारी, गंगाखेड तथा मतदार नोंदणी अधिकारी, ९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघ आणि कैलासचंद्र वाघमारे, तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी, ९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघ यांनी केले आहे.

# मारुती बर्वे यांची मृदंग वादनात उल्लेखनीय भरारी! 'अभिनव गंधर्व' पदवीने सन्मान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पालम (परभणी) :** श्री ज्ञानोबा माऊली उंब्रजकर वारकरी शिक्षण संस्था, हाळदव - लोहा येथे शिक्षण घेतलेल्या मारुती वामनराव बर्वे यांनी मृदंग वादनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मृदंग वादनात त्यांनी 'अभिनव गंधर्व' ही पदवी मिळवली असून, महाराष्ट्रातील ख्यातनाम मृदंग वादक विशाल महाराज बाभुळगावकर यांचे ते शिष्य आहेत.



पालम तालुक्यातील आईनवाडी येथील गरीब कुटुंबातून आलेल्या मारुती बर्वे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मृदंग वादनाची साधना सुरू ठेवली. आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही कलेची आवड, सातत्यपूर्ण मेहनत आणि गुरुंचे मार्गदर्शन यामुळे त्यांनी मृदंग वादनात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

वारकरी संप्रदायातील भजन, कीर्तन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये मृदंग वादनातून ते आपली कला सादर करीत आहेत. पारंपरिक वारकरी संगीताची साधना करत त्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या जिद्द, मेहनत आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेचे फलित मानले जात आहे.

मारुती बर्वे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल परिसरातून त्यांचे कौतुक होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचा संघर्ष, साधना आणि यश प्रेरणादायी ठरत आहे.

# थोडक्यात बातम्या

## ढोकेश्वर महाविद्यालयात 'ज्ञानज्योत' वार्षिक अंकाचे प्रकाशन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयात 'ज्ञानज्योत' या वार्षिक अंकाचा प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.वीरेंद्र धनशेट्टी होते. डॉ.भाऊसाहेब खिलारी आणि राजेंद्र मोरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय नगरकर यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर यांनी प्रास्ताविकात अंकाची संकल्पना आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. संपादक प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी अंकाची भूमिका मांडताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, साहित्यिक अभिव्यक्तीला आणि वैचारिक क्षमतेला व्यासपीठ मिळावे. या उद्देशाने या अंकाची निर्मिती करण्यात आली आहे. यात महाविद्यालयाच्या वर्षभरातील विविध उपक्रमांचे प्रतिबिंब उमटले आहे. मान्यवरांच्या हस्ते 'ज्ञानज्योत' अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. संजय नगरकर यांनी विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि संशोधनाची आवड जोपासण्याचे आवाहन केले. डॉ. वीरेंद्र धनशेट्टी यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा साहित्यिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.जिजाभाऊ घुले यांनी करून दिला. प्रा.शुभांगी पवार यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.एकनाथ जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले. शेवटी प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी पसायदान सादर केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंचूरच्या पाताळेश्वर महादेव मंदिरात साक्षात 'बाबा बर्फानी'चा देखावा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२,विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील निसर्गरम्य वातावरणात आणि लोनगंगा नदीच्या काठावर वसलेल्या जागृत श्री पाताळेश्वर महादेव मंदिरात तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच अत्यंत मंगलमय वातावरणात विधिवत पूजा व अभिषेक संपन्न झाले. या उत्सवानिमित्त संपूर्ण मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे मंदिरात साकारण्यात आलेला अमरनाथ येथील 'बाबा बर्फानी'चा साक्षात देखावा! बर्फाच्या साहाय्याने हुबेहूब अमरनाथ गुहेसारखी रचना करण्यात आली होती. तसेच शिवलिंगा जवळ दोन कबुतरे ठेवण्यात आली होती. हा अद्वितीय आणि भक्तिमय देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत श्री पाताळेश्वर महिला भजन मंडळाने सादर केलेल्या सुमधुर भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता महादेवाची भव्य महाआरती संपन्न झाली.महाआरतीनंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा (भंडारा) लाभ घेतला.श्री पाताळेश्वर भक्त मंडळ, विंचूर ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील शिवभक्तांच्या सामूहिक सहभागातून हा उत्सव मोठ्या दिमाखात आणि उत्साहात पार पडला.

## वरिष्ठ मुख्याध्यापक ज्ञानदेव शेलार यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०२, सातारा :** जावली मौजे मामुर्डी गावचे सुपुत्र व मेटगुताड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वरिष्ठ मुख्याध्यापक ज्ञानदेव तुकाराम शेलार यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा नुकताच मेटगुताड गावच्या ग्रामपंचायत सभागृहात उत्साहपुर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला. ज्ञानदेव शेलार यांनी ३८ वर्षे ९ महिन्यांचा कालखंड शिक्षण सेवेसाठी समर्पित केला. सेवानिवृत्तीचा क्षण हा एका प्रदीर्घ सेवापर्वाचा शेवट असला, तरी ज्ञानदेव शेलार यांच्या कार्याची आणि आठवणींची नवी सुरुवात असल्याची भावना यावेळी उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली. या प्रदीर्घ सेवेत त्यांनी जावली आणि महाबळेश्वर मधील विविध शाळा, विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि ग्रामस्थांशी निर्माण केलेले जिव्हाळ्याचे नाते या प्रसंगी प्रकर्षाने जाणवले. शेलार यांच्या कार्याचा गौरव करताना अनेकांनी आपल्या भावनांना वाट करून दिली.सहकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या साधेपणाचे, प्रेमळ स्वभावाचे आणि कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले.निरोपाच्या वेळी उपस्थितांच्या मनात आदराची भावना होती. आज शाळेच्या दैनंदिन कामकाजातून शेलार सरांची पावले दूर जात असली, तरी त्यांच्या कार्याची पाऊलखुणा मात्र विद्यार्थ्यांच्या मनात, सहकाऱ्यांच्या आठवणीत आणि ग्रामस्थांच्या हृदयात कायम राहतील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. पत्नी सौ. छाया शेलार व कुटुंबीयांनी त्यांच्या या प्रदीर्घ सेवाप्रवासात दिलेल्या सहकार्याबद्दलही उपस्थितांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली. कुटुंबाच्या पाठबळामुळेच सेवेत येणाऱ्या अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडता आल्या, याची जाणीव या भावनिक क्षणी ज्ञानदेव शेलार यांनी व्यक्त केली.सेवानिवृत्ती म्हणजे सेवेला पूर्णविराम नव्हे, तर आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे, या भावनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. ज्ञानदेव शेलार यांच्या पुढील आयुष्यातील प्रत्येक दिवस आनंद, समाधान, उत्तम आरोग्य आणि कुटुंबीयांच्या सहवासाने सुखमय जावो, यासाठी उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भावपूर्ण वातावरणात, स्नेहाच्या आठवणी आणि शुभेच्छांची शिदोरी देत शेलार सरांना निरोप देण्यात आला. यावेळी पंचायत समिती महाबळेश्वरचे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, आजी माजी शिक्षक, पहीपाहुणे, मेटगुताड व मामुर्डी ग्रामस्थ उपस्थित होते.

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंता पदी डॉ.भूषण शिंदे यांची निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** स्थानिक औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विवेक रोकडे यांची महानिर्मितीच्या कार्यकारी संचालक (प्रकल्प) पदी पदोन्नती झाल्याने त्यांच्या रिक्त जागी नाशिक येथील डॉ.भूषण शिंदे यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली आहे.